PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gosht Dhamal Namyachi
Year: 1982

Song: Aaj Majhe Tujhe Guj Zale Pure
Lyricist: Sudhir Moghe

आज माझे तुझे गुज झाले पुरे
गीत ओठातूनी अमृताचे झरे
स्वर्ग ये भुवरी हा जणू साजणा
स्वप्नात मी नाही ना सख्या रे
स्वप्नात मी नाही ना
आज माझे तुझे गुज झाले पुरे
गीत ओठातूनी अमृताचे झरे
स्वर्ग ये भुवरी हा जणू साजणा
स्वप्नात मी नाही ना सख्या रे
स्वप्नात मी नाही ना

नभ निळे कुठे बघ धरेवरी
अधीर रातीला चांदण्याची मिठी
अधर फुलांचे झुळूक चुंबिते
बघ तरू तरी का मना गुंतवी
तुझी माझी प्रित तिथे
तुला मला दिसते रे
तुझे माझे गीत प्रिया
इथे तिथे घुमते रे
तुझी मी तुझी मी तू सांग ना
स्वप्नात मी नाही ना सख्या रे
स्वप्नात मी नाही ना

आ...
देह ही चांदणे
स्पर्श ही चांदणे
सौख्य ही चांदणे
वेचिते चांदणे
प्रितीला खुळा स्पर्श जागवी
स्पर्श बोलवी शब्द झाले मुके
इंद्रजाल हे उघडिले कुणी
त्यात नाहते विश्व सारे तुझे
कण कण देह जणू
फुलावपी फुलतो रे
क्षण क्षण जगध्याचा
प्रितीवरी झुलतो रे
कुणाचा कुणाचा तू सांग ना
स्वप्नात मी नाही ना सख्या रे
स्वप्नात मी नाही ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*